# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

क्र. प्रले/वित्त/प्रकल्प/09

दिनांक 23 /09/2022

विषयः- मुंबई सुशोभिकरण अभियानाबाबत.

मुंबई शहराचा सर्वांगीण विकास करीत असताना मुंबईतील नागरिकांना व इतर अभ्यागतांना सर्व सोयी-सुविधांचा पुरेपुर लाभ व्हावा, या हेतूने मुंबई सुशोभिकरण अभियानाबाबत यापूर्वीच निर्देश देण्यात आलेले आहेत. तरी मुंबई सुशोभिकरण अभियान राबविताना पुढील 3 महिने किंवा दि.31.03.2023 पर्यंत फक्त सुशोभिकरणांच्या कामांसाठीच अनुसरायची मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे आहेत -

1) कामाच्या आवश्यकतेनुसार सुशोभिकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक रु.25 लाखापेक्षा जास्त असले, तरीही हि कामे विभाग पातळीवर निम्नलिखित बाबींच्या अधीन राहून करता येऊ शकेल.

   अ) अश्या कामांकरिता 3 पॅकेट पध्दतीने ई-निविदा मागविणे आवश्यक असेल.

   ब) प्रमाणित निविदा दस्तऐवज (Standard Bid Document) मध्ये नमूद केल्यानुसार कामाची व्याप्ती, व स्वरुपानुसार तांत्रिक अर्हता, वित्तीय अर्हता बाबतचे पात्रता निकष आणि अटी व शर्ती मसुदा निविदेमध्ये अंतर्भूत करणे आवश्यक असेल.

   क) परिपत्रक क्र. प्रले/एफआरडी-I/5 दि.10.05.2016 मध्ये नमूद केल्यानुसार कामाची व्याप्ती, कार्यालयीन अंदाज रक्कम व स्वरुपानुसार सक्षम अधिका-यांची तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता प्राप्त करणे आवश्यक असेल.

2) कोणत्याही परिस्थितीमध्ये मोठया रक्कमेच्या कामांची छोटया छोटया कामात विभागणी करुन (splitting of works) ई-निविदा काढून कामे पार पाडण्यात येऊ नयेत.

3) या प्रकरणी, कामाची निकड पाहता एक विशेष बाब म्हणून कमी मुदतीची सार्वजनिक वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिरात सूचना प्रदर्शित करुन मुंबई सुशोभिकरण अभियानाअंतर्गत विविध कामे प्राधान्याने पार पाडणे आवश्यक असेल.

उपरोक्त मार्गदर्शक तत्वांची सर्व खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांनी नोंद घ्यावी व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सही/-20-09-2022

(प्रदीप भा.पडवळ)

**प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.**

सही/-20-09-2022

(रामदास आव्हाड)

**उप आयुक्त (वित्त)**

सही/-20-09-2022

(श्री.पी.वेलरासू)

**अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)**

सही/-23-09-2022

(श्री.इ सि चहल )

**महानगरपालिका आयुक्त**

## परिपत्रक

क्र. प्रले/वित्त/प्रकल्प/09 दिनांक 23 /09/2022

प्रत.........................................यांना (           जादा प्रतींसह) महितीमाठी व आवश्यक त्या कार्यवाहीमाठी कृपया अग्रेषित.

प्रमुख लेखापाल (वित्त)यांजकरिता